MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १६ अंक : ६ पाने : ८ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

तौक्ते व निसर्ग चक्रीवादळादरम्यान महापारेषण कंपनीने वीजपुरवठा सुरळीत व अखंडित ठेवण्यासाठी केलेले परिश्रम हा कंपनीच्या जबाबदारीचा भाग होता. तथापि, कोविड-१९ महामारीच्या दरम्यान विविध नगरपालिका, महानगरपालिकांना व समाजसेवी संस्थांना रूग्णवाहिका व व्हॅक्सीन उपलब्ध करून देणे, या माध्यमातून सामाजिक बांधीलकीही जपण्याचा महापारेषण कंपनीने प्रयत्न केला. या कामांची पावती

- **संकटात कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान**
- **महापारेषणने जपली सामाजिक बांधिलकी**
- **कंपनीच्या वर्धापनदिनी कर्मचाऱ्यांचा सत्कार**
- **कंपनीची प्रतिमा अधिक उंचावणार**

म्हणून महापारेषण कंपनीस नवी दिल्लीच्या ग्रीनटेक फाऊंडेशनने सांघिक सामाजिक जबाबदारी (CSR) पुरस्काराने गौरविले.

अति उच्च दाब प्रणालीचा विकास व तिच्या संचलन व सुव्यवस्थेसाठी संचालक (प्रकल्प) व संचालक (संचलन व सुव्यवस्था) ही पदे कंपनीच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. तथापि, प्रणाली उभारणी व संचलनाच्या दृष्टीने माहितगार अधिकारी या पदांवर नियुक्त झाल्यामुळे नेमलेली उद्दिष्ट्ये पूर्ण होतील, अशी आशा आहे. तसेच मनुष्यबळाचा विकास व मनुष्यबळ व्यवस्थापनासाठीही संचालक (मानव संसाधन) हे पद निर्माण करून तत्पर व कार्यक्षम मनुष्यबळ निर्मितीसाठी कंपनीने पावले उचलली आहेत.

कठीण समस्यांना सामोरे जात असताना नावीन्यपूर्ण कल्पनांचा वापर करून व अडचणींवर यशस्वीरित्या मात करत जबाबदारी पार पाडत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी कंपनीच्या विविध प्रसिध्दी माध्यमांतून प्रसिध्दी देण्यात येईल. अशा वर्षभरातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचा कंपनीच्या वर्धापनदिनी सत्कार करण्याचा निर्णय घेण्यात आला, ही कौतुकास्पद बाब आहे.

तसेच क्षेत्रीय उपक्रम, नवीन प्रकल्प व कामगिरी यांची प्रसिध्दी विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवर उदा. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम याव्दारे कर्मचारी व जनता यांना माहिती करून देणे विचाराधीन आहे. यामुळे महापारेषण कंपनीची जनमानसातील प्रतिमा उंचावण्यास मदत होईल.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कार्यकाळापासून ते आजपर्यंत महापारेषण कंपनीच्या अंतर्गत विभागीय परीक्षा महावितरण कंपनीमार्फतच आयोजित करण्यात येत होत्या.

तथापि, त्रिभाजनानंतर महापारेषण कंपनीसाठी उपयुक्त असलेला अभ्यासक्रम लक्षात घेऊन पुढील काळात या परीक्षा महापारेषण कंपनीसाठी मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांच्यामार्फत आयोजित करण्यात येतील. यामुळे पारदर्शकता वाढून वेळही वाचेल. क्षेत्रीय कार्यालयांना प्रोत्साहित करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या पारितोषिक धोरणात २०१० पासून बदल झालेला नाही. या धोरणात परिस्थितीनुसार बदल करून सदर सुधारित धोरण लवकरच राबविण्यात येईल.

नैसर्गिक आपत्ती उदा. चक्रीवादळ, पूरपरिस्थिती, कोविड-१९ महामारी इ. मध्ये प्रकल्प विभाग आणि संचलन व सुव्यवस्था विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी संकटांवर मात करून केलेले काम याची



**दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

सविस्तर माहिती इतर अधिकारी व कर्मचारी यांना करून देण्याचा उपक्रम (Project/ O&M Summit) राबविण्यात येणार आहे.

महापारेषण कंपनीतील मानव संसाधन, वित्त व तांत्रिक या तिन्ही विभागात कामांचा समन्वय असणे गरजेचे आहे. त्याकरिता आंतर विभागीय प्रशिक्षण (Inter Disciplinary Training) चा उपक्रम राबविणे गरजेचे आहे. तसेच पदोन्नती, बदली झाल्यानंतर कार्यालयीन कामकाज सुरळीत व लवकर होण्यासाठीही कर्मचारी व अधिकाऱ्यांना प्रशिक्षणाची गरज आहे.

सध्या पावसाळा संपल्यामुळे प्रकल्प आणि संचलन व सुव्यवस्था विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना नेमून दिलेली कामे सुरक्षा मानकांचे पालन करत विहित कालावधीत पूर्ण करतील, असा मला विश्वास आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**कराड :** अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था कराड परिमंडळात महापारेषणच्या कामकाजासंदर्भात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली.

### ■ प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिल्या सूचना ■

# महापारेषणच्या कामकाजासंदर्भात कराड येथे आढावा बैठक

■ *टीम महापारेषण, कराड*

अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था, परिमंडळ, कराड येथे महापारेषणच्या कामकाजासंदर्भात महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये चालू असलेल्या प्रकल्पांच्या कामकाजाबाबतचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासंदर्भात संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या. तसेच २०२१-२२ च्या देखभाल दुरुस्ती व CAPEX अंदाजपत्रक व झालेला खर्च याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच दिलेले `लक्ष्य` पूर्ण करण्यासंदर्भात संबंधितांना सूचना देण्यात आल्या.

४०० के. व्ही. ग्रहणकेंद्र येथे भेट देऊन पेट्रोलिंगचे काम ड्रोनव्दारे कसे केले जाते, याबाबत प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



**कराड :** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, मुख्य अभियंता (प्रभारी) श्रीमती शिल्पा कुंभार, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. सुनील सूर्यवंशी व अन्य अधिकारी.

या बैठकीमध्ये संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, मुख्य अभियंता (प्रभारी) श्रीमती शिल्पा कुंभार, मुख्य अभियंता तथा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. सुनील सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता श्री. अविनाश शिंदे, श्री. सी. एल. कोळी, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. अतुल मनुरकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं) (प्रभारी) श्री. राजू कोळी, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. पी. एस. पाटील, कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्री. पी. जी. जोशी यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


मी जबाबदार



माझा मास्क. माझी सुरक्षा.

महाराष्ट्र शासन



**पुणे :** महापारेषण व त्रिशरण एनलाईटनमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित झलकारी सुरक्षा रक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप व प्रमाणपत्र वितरण समारंभप्रसंगी अप्पर पोलिस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे, निवृत्त अतिरिक्त मुख्य सचिव श्री. उज्ज्वल उके, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. प्रशांत चौधरी, श्री. सचिन कडलग, त्रिशरण एनलाईटनमेंट फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका प्रज्ञा वाघमारे, श्री. प्रशांत वाघमारे, सांची वाघमारे, अर्चना बनकर, गौरी सोनवणे आदी.

## महापारेषण व त्रिशरण एनलाईटनमेंट फाऊंडेशनचा पुढाकार

# महिला सुरक्षा रक्षक कार्यक्रम पथदर्शी ठरेल : श्री. पोकळे

*टीम महापारेषण, पुणे*

''केवळ कठोर कायदे करून महिला व लहान मुलांवरील अत्याचार थांबणार नाहीत, तर त्यासाठी समाजातील मानसिकता बदलणे गरजेचे आहे. प्रत्येक आस्थापनेच्या ठिकाणी महिला सुरक्षा रक्षक कार्यक्रम पथदर्शी ठरेल'', असे प्रतिपादन अप्पर पोलिस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे यांनी केले. अन्याय, अत्याचाराविरोधात आवाज उठवण्याचे काम 'झलकारी' उपक्रमातून होईल, असेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) व त्रिशरण एनलाईटनमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित झलकारी सुरक्षा रक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप व प्रमाणपत्र वितरण श्री. रामनाथ पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. पत्रकार भवनात झालेल्या या सोहळ्याला निवृत्त अतिरिक्त मुख्य सचिव श्री. उज्ज्वल उके, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. प्रशांत चौधरी, श्री. सचिन कडलग, त्रिशरण एनलाईटनमेंट फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका प्रज्ञा वाघमारे, श्री. प्रशांत वाघमारे, सांची वाघमारे, अर्चना बनकर, गौरी सोनवणे आदी उपस्थित होते.

श्री. रामनाथ पोकळे म्हणाले, ''सुरक्षित पुणे शहरासाठी मायसेफ पुणे, भरोसा सेल, दामिनी पथक असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महिलांची छेडछाड, अत्याचार रोखण्यासाठी पोलिस, सामाजिक संस्था कार्यरत आहेत. समाजातील प्रत्येकाचा आत्मसन्मान जपला पाहिजे. सर्वांना समान न्याय देण्याचे कर्तव्य पोलिसांचे असले, तरी समाजातील प्रत्येकाचा सहभाग असणेही तितकेच गरजेचे आहे.''

श्री. उज्ज्वल उके म्हणाले, ''सामाजिक संस्था, शासन आणि कार्पोरेट क्षेत्राने एकत्रित काम केले तर परिवर्तन नक्की होते. महिला सुरक्षा, त्यांच्यासाठीच्या पायाभूत सुविधा उभारण्याची गरज आहे. महिलांना प्रशिक्षण देऊन रोजगार व सुरक्षा पुरविण्याचे काम कौतकास्पद आहे.''

श्री. अभिषेक अवचार यांनी सूत्रसंचालन केले तर प्रशांत वाघमारे यांनी आभार मानले.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे ऑक्टोबर - नोव्हेंबर २०२१

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | नितीन कृष्णराव कांबळे | उपमहाव्यवस्थापक (मा.सं.म.नि.) | सांघिक कार्यालय, मुंबई | ०५.०७.२०२१ |
| २. | मुकेश साहेबराव तट्टे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडळ, अमरावती | ०८.११.२०२१ |

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | रवींद्र दिनकरराव चव्हाण | मुख्य अभियंता (पारेषण) | कंत्राटे व अनुश्रावके विभाग, सांघिक कार्यालय, मुंबई | २९.१०.२०२१ (स्वेच्छानिवृत्ती) |
| २. | सुरेश दशरथ देवगुणे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | चाचणी व दूरसंचार मंडळ, वाशी | ३१.१०.२०२१ |

# महापारेषणच्या संचालक (संचलन) पदी श्री. अनिल व्ही. कोलप



महापारेषणच्या संचालक (संचलन) पदी श्री. अनिल विलास कोलप यांची दि. ५ ऑक्टोबर २०२१ पासून नियुक्ती करण्यात आली.

श्री. कोलप हे शिवाजी विद्यापीठाच्या वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगलीचे बी. ई. (इलेक्ट्रिकल) पदवीधर आहेत. त्यांनी भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (शिवाजी विद्यापीठ), कोल्हापूर येथून डीसीएम (डिप्लोमा इन कॉंप्युटर मॅनेजमेंट) पूर्ण केले.

१९९१ मध्ये पदवी घेतल्यावर ते पूर्वीच्या एम.एस.ई.बी.मध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून रुजू झाले आणि त्यांची १३२ के.व्ही. संगमेश्वर (अउदा संवसु विभाग बाभळेश्वर) नाशिक क्षेत्र येथे नियुक्ती झाली. ऑगस्ट २००३ मधील थेट नेमणुकीअंतर्गत त्यांची अतिरिक्त कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली आणि डिसेंबर २००९ मध्ये अधीक्षक अभियंता म्हणून निवड झाली आणि त्यांची नेमणूक ऊर्जा लेखा विभाग, राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली येथे झाली. २०१८ साली त्यांची पदोन्नती मुख्य अभियंता पदावर झाली व त्यांची नेमणूक राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली येथे झाली.

एसएलडीसी येथे त्यांनी स्ट्रीमलायनिंग ऑफ व्हिजिबिलिटी, व्हिडिओ वॉल बदलणे, आरईएमसीचे कार्यान्वयन, आरईडीएसएम रेग्युलेशन कोड ॲण्ड प्रोसिजरची इन हाऊस तयारी, डीएसएम कोर्स व प्रोसिजर, मिटरींग कोड व प्रोसिजर आऊटेज मॅनेजमेंट स्टॅन्डर्डायझेशनची महत्त्वाची कामे केली. त्यानंतर त्यांची नेमणूक कराड विभागाचे मुख्य अभियंता म्हणून झाली होती. त्यांच्या पुढील जबाबदारीकरिता खूप-खूप शुभेच्छा!

# महापारेषणच्या संचालक (प्रकल्प) पदी श्री. नसीर कादरी



महापारेषणच्या संचालक (प्रकल्प) पदी श्री. कादरी सय्यद नसीर यांची ५ ऑक्टोबर २०२१ पासून नियुक्ती करण्यात आली.

त्यांनी औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून १९९१ मध्ये विद्युत अभियांत्रिकीची पदवी मिळविताना सुवर्ण पदकाचा मान पटकावला, तसेच ते गेट-१९९४ च्या परीक्षेमध्ये भारतात ३८८ व्या क्रमाकांने उत्तीर्ण झाले.

१९९२-९४ दरम्यान त्यांनी औरंगाबादच्या एमआयटी महाविद्यालयात व्याख्यात्याचे काम केले. १९९४ साली त्यांनी तत्कालीन एमएसईबीमधील कनिष्ठ अभियंता पदावर सुरुवात केली.

२००६ साली थेट नियुक्ती अभियानांतर्गत त्यांची निवड होऊन कार्यकारी अभियंतापदी पदोन्नती होऊन त्यांनी विविध ठिकाणी महापारेषणच्या विविध जबाबदाऱ्यांचा कार्यभार सांभाळला.` औरंगाबाद येथे कार्यकारी अभियंता (प्रकल्प) पदावर काम करताना त्यांच्या टीमने वर्ष २००९-१० मध्ये अउदा उपकेंद्रे व वाहिन्या सर्वोच्च संख्येने पूर्ण करण्यात यश मिळवून महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवला.

जुलै २०१२ मध्ये थेट नियुक्ती अभियानांतर्गत त्यांची पदोन्नती अधीक्षक अभियंता (पारेषण) पदावर झाली आणि ते रचना व अभियांत्रिकी विभाग, सांघिक कार्यालय, मुंबई येथे रुजू झाले. सप्टेंबर २०१९ पर्यंत त्यांनी महापारेषणच्या टीसीसी, टेंडरिंग आणि संवाद विभागांमध्ये अधीक्षक अभियंता पदावर काम केले व त्यानंतर त्यांना मुख्य अभियंता पदावर पदोन्नती मिळाली व त्यांनी अउदा संवसु परिमंडळ, वाशी येथे मुख्य अभियंता पदावर काम सुरू केले.

त्यांना व त्यांच्या टीमला केकतनिंभोरा उपकेंद्र डिजिटल केल्याबद्दल प्रतिष्ठित स्कॉच गोल्ड अवॉर्ड २०१८ मध्ये मिळाला तर एमटीसीआयएल ओपीजीडब्ल्यू कामांकरिता स्कॉच गोल्ड अवॉर्ड २०२० मिळाला. ते युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कले येथील गोल्डमॅन स्कूल ऑफ पब्लिक पॉलिसी येथे भेट देणाऱ्या टीममध्ये होते. जेथे महाराष्ट्र : शाश्वत भवितव्याकडे ऊर्जावान होताना हा कार्यक्रम केला.

## ■ संचालिका ऐश्वर्या राठोड यांनी स्वीकारला पुरस्कार ■

# इंडिया इमर्जिंग लीडर-२०२१ पुरस्कार `सरफेस` कंपनीला प्रदान

■ *टीम महापारेषण, पुणे*

इंडिया इमर्जिंग लीडर-केमिकल्स मॅन्युफॅक्चरर (महाराष्ट्र) या श्रेणीमध्ये "सरफेस केमिकल टेक्नॉलॉजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना यंदाचा "मेक इन इंडिया इमर्जिंग लीडर-२०२१ पुरस्कार प्रदान करण्यात आला. गोवा येथे आयोजिलेल्या कार्यक्रमात कंपनीच्या वतीने संचालिका ऐश्वर्या रोहिदास राठोड यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

स्टार्टअप, एसएमई, एमएसएमई म्हणून हा पुरस्कार घोषित करण्यात आला. सरफेस केमिकल टेक्नॉलॉजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये ऐश्वर्या रोहिदास राठोड, इतिषा दीपक चौधरी व सौ. पूजा दीपक चौधरी या महिला संचालिका आहेत. ऐश्वर्या रोहिदास राठोड यांनी हा पुरस्कार स्वीकारून कंपनीमधील सर्व कामगारांचे कौतुक करून त्यांना हा पुरस्कार समर्पित केला. ऐश्वर्या रोहिदास राठोड ही महापारेषणच्या श्री. रोहिदास राठोड यांची मुलगी आहे.




मी जबाबदार
मी जबाबदार
मी जबाबदार
मी जबाबदार
महाराष्ट्र शासन
माझा मास्क. माझी सुरक्षा.




**नाशिक :** महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांनी नाशिक परिमंडळास भेट दिली. संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांच्या हस्ते उपस्थितांना संविधानपुस्तिकेचे वाटप करण्यात आले.

### ■ अधिकाऱ्यांना केले संविधानपुस्तिकेचे वाटप ■

# नाशिक परिमंडळाला संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांची भेट

■ *टीम महापारेषण, नाशिक*

महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांनी नाशिक परिमंडळाला भेट दिली. सदर बैठकीदरम्यान, संचलन व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून विविध कामकाजांचा आढावा घेतला. आपल्या अनुभवातून संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांनी विविध तांत्रिक बाबींवर सखोल मार्गदर्शन केले. नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून आपण पारेषण प्रणाली अधिक चांगल्या प्रकारे कशी सुस्थितीत ठेऊ शकलो, हे देखील सांगितले.

सध्याच्या स्पर्धेच्या युगामध्ये महापारेषण कंपनीला कोणकोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागणार असून आपण त्यासाठी कसे सक्षम व्हायला हवे, याबाबत मार्गदर्शन केले. या बैठकीला नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड, अति उच्च दाब प्रकल्प मंडळ, नाशिक येथील अधीक्षक अभियंता श्री. अनिल भारसाकळे, चाचणी तथा दूरसंचार मंडळ नाशिक येथील अधीक्षक अभियंता श्री. माणिक गुट्टे, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. विजय नलावडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. प्रमोद गोडसे आदी अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकींमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांच्या हस्ते उपस्थितांना संविधानपुस्तिकेचे वाटप करण्यात आले.

# महापारेषणच्या मुख्य औद्योगिक संबंध अधिकारीपदी श्री. भरत पाटील




महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारीपदी श्री. भरत पाटील यांची पदोन्नतीद्वारे नियुक्ती झाली. १५ नोव्हेंबर २०२१ रोजी त्यांनी पदभार स्वीकारला.

श्री. पाटील हे यापूर्वी दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना या ठिकाणी कल्याण अधिकारी म्हणून १९९९ ते २०११ पर्यंत कार्यरत होते. २०११ ते २०१३ या कालावधीत त्यांनी कल्याण अधिकारी म्हणून महानिर्मिती कंपनीच्या जलविद्युत केंद्र पोफळी, चिपळूण येथे कार्यभार सांभाळला होता. यानंतर २०१३ मध्ये त्यांची महापारेषण कंपनीच्या सांघिक कार्यालय, मुंबई येथे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी या पदावर नियुक्ती झाली. तेथे त्यांनी २०१३ ते २०२१ या कालावधीत या पदाचा कार्यभार सांभाळला. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

मी जबाबदार



मी जबाबदार



महाराष्ट्र शासन

माझा मास्क. माझी सुरक्षा.

Mock Drill

■ पेंच जलविद्युत केंद्राचा केला उपयोग ■

# अंबाझरीतील भार प्रेषण केंद्रात सराव कवायत यशस्वी

■ *टीम महापारेषण, अंबाझरी*

भार प्रेषण केंद्र, अंबाझरी येथे पेंच जलविद्युत केंद्राचा उपयोग करून (Black Start Mock Drill) सराव कवायत यशस्वीरित्या पार पडली. हा प्रयोग पहिल्यांदाच यशस्वी झाला. यामध्ये सहभागी पेंच जलविद्युत केंद्र हे मध्यप्रदेश येथे व खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र महाराष्ट्र येथे स्थित आहे.

या प्रयोगात पेंच जलविद्युत केंद्र ते खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रापर्यंत लहान बेट तयार करण्यात आले. पेंच जलविद्युत केंद्र सुरू करून ऊर्जा खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथील विद्युत जनित्राची सहाय्यक प्रणाली चालवण्यात आली. या प्रयोगात १७ मेगावॅटपर्यंत भार घेण्यात आला. तयार करण्यात आलेले बेट पेंच उपकेंद्र येथे राष्ट्रीय ग्रीडसोबत जोडण्यात आले.

या यशस्वी प्रयोगामध्ये पेंच जलविद्युत केंद्र, क्षेत्रीय भार प्रेषण केंद्र, राज्य भार प्रेषण केंद्र, मध्यप्रदेश भार प्रेषण केंद्र, जबलपूर, महानिर्मिती नागपूर झोन, महापारेषण सिवनी चाचणी विभाग मध्यप्रदेश पारेषण कंपनी मर्यादित, महावितरण यांचा सहभाग होता.

या प्रयोगाची संकल्पना व क्रियान्वयन भार प्रेषण केंद्र, अंबाझरी यांचे असून हा प्रयोग यशस्वी करण्यासाठी राज्य भार प्रेषण केंद्राचे कार्यकारी संचालक श्री. श्रीकांत जलतारे, नागपूरचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. सतीश अणे यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रयोग यशस्वी करण्यासाठी अधीक्षक अभियंता सर्वश्री अरविंद डडमल, कार्यकारी अभियंता (प्रभारी) राजेंद्र वेखंडे, उपकार्यकारी अभियंता पंकज शिंदे, सहाय्यक अभियंता सचिन पेंदोर, निशांत हरजाल यांनी परिश्रम घेतले.



**अंबाझरी :** भार प्रेषण केंद्रात पेंच जलविद्युत केंद्राचा उपयोग करून सराव कवायत यशस्वीरित्या पार पडली. याप्रसंगी राज्य भार प्रेषण केंद्राचे कार्यकारी संचालक सर्वश्री श्रीकांत जलतारे (मध्यभागी), नागपूरचे मुख्य अभियंता (प्रभारी) सतीश अणे, अरविंद डडमल, कार्यकारी अभियंता (प्रभारी) राजेंद्र वेखंडे, उपकार्यकारी अभियंता पंकज शिंदे, सहाय्यक अभियंता सचिन पेंदोर, निशांत हरजाल व अन्य अधिकारी. परिमंडळ, नागपूरचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. अविनाश कसबेकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. अभय रोही, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. प्रवीणकुमार दामके, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. विलास रंगारी.

Power for All

■ मध्य रेल्वेला सुरळीत व योग्य दाबाने वीजपुरवठा होणार ■

# २२० के. व्ही. खारबाव उपकेंद्र तात्काळ कार्यान्वित




**खारबाव :** मध्य रेल्वे व जलद मालवाहतूक रेल्वे महामंडळ यांना विद्युत पुरवठा करण्यासाठी २२० के. व्ही. खारबाव (GIS) उपकेंद्र तात्काळ कार्यान्वित करण्यात आले. याप्रसंगी मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, अधीक्षक अभियंता श्री. रवींद्र नगरे, अधीक्षक अभियंता श्री. पीयूष शर्मा, अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. मोरेश्वर ढोरे, कार्यकारी अभियंता श्री. गिरीश मालोदे, श्री. मोहन ननवरे, श्री. विजय आवारे यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी. रोही, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. प्रवीणकुमार दामके, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. विलास रंगारी.

■ *टीम महापारेषण, वाशी*

मध्य रेल्वे व जलद मालवाहतूक रेल्वे महामंडळ यांना विद्युत पुरवठा करण्यासाठी २२० के. व्ही. खारबाव (GIS) उपकेंद्र तात्काळ कार्यान्वित करण्यात आले. त्यामुळे मध्य रेल्वेला सुरळीत व अखंडितपणे योग्य दाबाने विद्युत पुरवठा करण्यास मदत होणार आहे.

या उपकेंद्राचे उद्घाटन वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांनी दूरदृश्यप्रणालीव्दारे केले. याप्रसंगी मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, अधीक्षक अभियंता श्री. रवींद्र नगरे, अधीक्षक अभियंता श्री. पीयूष शर्मा, अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. मोरेश्वर ढोरे, कार्यकारी अभियंता श्री. गिरीश मालोदे, श्री. मोहन ननवरे, श्री. विजय आवारे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या प्रयोग यशस्वी करण्यासाठी अधीक्षक अभियंता सर्वश्री अरविंद डडमल, कार्यकारी अभियंता (प्रभारी) राजेंद्र वेखंडे, उपकार्यकारी अभियंता पंकज शिंदे, सहाय्यक अभियंता सचिन पेंदोर, निशांत हरजाल यांनी परिश्रम घेतले.

माझे संविधान, माझा अभिमान

■ संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन ■

# महापारेषणमध्ये संविधान दिवस साजरा



**मुंबई :** महापारेषणच्या सांघिक कार्यालयामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. श्रीकांत राजूरकर, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. मोतीसिंह चौहान, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील.

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला.

सुरूवातीला महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांच्या उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. यावेळी संचालक (प्रकल्प) सर्वश्री नसीर कादरी, संचालक (वित्त) अशोक फळणीकर, कार्यकारी संचालक (पारेषण) श्रीकांत राजूरकर, महाव्यवस्थापक (मा. सं.मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) राजू गायकवाड, मुख्य अभियंता (स्थापत्य) मोतीसिंह चौहान, उपमहाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकशाहीचा जागर, संविधानाचा आदर

■ अधिकाऱ्यांनी केले भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन ■

# पुण्यामध्ये संविधान दिवस उत्साहात साजरा



**पुणे :** महापारेषणच्या पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व भारतीय संविधानाचे पूजन केले.



**पुणे :** महापारेषणच्या पुणे परिमंडळामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा केला.

■ *टीम महापारेषण, पुणे*

महापारेषणच्या पुणे परिमंडळामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा केला.

सुरूवातीला पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व भारतीय संविधानाचे पूजन केले.

यावेळी चाचणी व दूरसंचारण मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. जयंत कुलकर्णी, अधीक्षक अभियंता श्रीमती चारूता बेंद्रे, श्रीमती ज्योती चिमटे, श्री. प्रकाश कुरसंगे, श्री. सतीश गायकवाड, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. प्रशांत चौधरी, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. मिलिंद घोलप, सहाय्यक मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. सुभाष भिलारे, कार्यकारी अभियंता श्री. संतोष बिदे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. केदार रेळेकर यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

From the Desk of ED, HR

# साधनेशिवाय यश नाही




Success is product of constant Effort अर्थात सततच्या प्रयत्नांमुळेच यश मिळते. म्हणूनच आपण सततच्या प्रयत्नाला एक प्रकारची साधनाही म्हणू शकतो. प्रत्येक यशस्वी व्यक्तीची साधना ही मोठी असते. त्या व्यक्तीची चिकित्सा केली असता आपल्याला त्याने केलेल्या साधनेबद्दल प्रचिती मिळते. त्याबद्दल आपल्या मनातला त्या व्यक्तीबद्दलचा आदर आणखी वाढतो.

चित्रपटसृष्टीतला सुपरस्टार अमिताभ बच्चन असू द्या किंवा क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, गानसम्राज्ञी लता मंगेशकर किंवा उद्योगपती रतन टाटा, सर्वांनी आपल्या जीवनात अमर्याद साधना केलेली आपल्याला दिसून येईल. साधनेशिवाय कोणालाही यशस्वी होताना आपण पाहत नाही. ज्याची जेवढी साधना मोठी, त्याची यशाची शिखरे तितकीच मोठी.

साधना करताना लागते ती प्रचंड शिस्त, टापटीपपणा, कटिबध्दता, प्रेम, काम करण्याची प्रखर इच्छाशक्ती. आपल्याला जे `लक्ष्य' प्राप्त करायचे आहे, त्याबाबत निर्माण झालेली मनात प्रचंड आवड, निकड, गरज. जिथे आवड असते, तिथे अर्थातच सवड असते. आपण ती साधना नित्यनियमाने करू शकतो.

कधी-कधी अपरिहार्य कारणास्तव आपल्या साधनेमध्ये खंड पडतो. त्यामुळे आपण मागे पडतो. आपल्याला आता शक्य नाही. आपण हरलो, याचा आपण स्वीकार करतो. परंतु, तसे न करता आपण ते `लक्ष्य' पार करण्याची इच्छा, ध्येय असेल तर आपल्यामधील इच्छाशक्ती जागृत करून गेलेला काळ भरून काढून आपली साधना पूर्ण करता आली पाहिजे. जो हार कर भी जितता है, उसे बाजीगर कहते है।

सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उभे राहिलेले `चाळीतील टॉवर' आपण पाहिले आहेत. संघर्ष हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. जीवनात संघर्षच नसेल तर जीवनप्राप्तीचा आनंद मिळणार नाही. घाम गाळल्यानंतर अर्थात परिश्रम घेतल्यानंतर मिळणारा आनंद हा निर्भेळ असतो. त्याची कशाचीही तुलना होणे शक्य नाही. माझ्या जीवनात खूप संघर्ष आहे, असे वारंवार सांगून दुःखी होण्यापेक्षा संघर्षातील आनंदही आपण लुटला पाहिजे. जीवनात इच्छित स्थळी पोहोचण्यात आनंद तर आहेच. पण, त्याहीपेक्षा जास्त आनंद त्यातील प्रवासात आहे. तो आपण घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

इच्छा असेल तर मार्ग आपोआप सापडतो, ही म्हण तंतोतंत उपयोगी पडते. मात्र, त्या रस्त्याने जायचे असेल तर अंगी शिस्त ही बाळगावीच लागेल. सरावाने आपण एखादी गोष्ट वारंवार केल्याने आपण त्यामध्ये पारंगत होतो. अर्थातच सरावामुळे आपल्यात निपुणता प्राप्त होते. जीवनात सरावानेच तर माणूस परिपूर्ण होतो. शिस्त आपल्याला जमिनीवर ठेवते. तसेच आपल्या मनाला स्थिर ठेवते. त्यामुळे कामातील एकाग्रता वाढून आपली साधना उच्चकोटीची होते. तसेच आपल्याला आपल्या उद्देशांची पुढची पायरी गाठायला मदत होते.

चंचल स्वभावामुळे कोणतीच इच्छा पूर्णत्वाला जात नाही. त्यामुळे नकारात्मक भाव मनात निर्माण होऊन निराशेकडे वाटचाल सुरू होते. त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत साधनेमध्ये खंड पडता कामा नये. पण, अपरिहार्य कारणामुळे पडलाच तर तो भरून काढून आपली साधना `लक्ष्य' पूर्ण होईपर्यंत अविरत सुरू ठेवावी.

**शुभेच्छांसह..!**

**- सुगत गमरे**
**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.